IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 4 | ISSUE 3 | MARCH-APRIL 2018

*Editor in Chief*

**Dr Kalyan Gangarde**

VOL. 4 | ISSUE 3| MARCH-APRIL 2018 (UGC Approved Journal No. 63716) Impact Factor: 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**BOOK 2**

*Chief Editor:*

**Dr Kalyan Gangarde,**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)

*Co- editors*

**Dr. Sadhana Agrawal,**
Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India

**Dr Grishma Khobragade,**
Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

**Dr. Pandurang Barkale,**
Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai

**Dr. Bharat Gugane,**
Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra

**Dr. Dashrath Kamble,**
Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra



*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

# Contents


1. An Analytical Study Of English Language Teaching Stratagems And Its Testing And Evaluation Strategies
**Dr. Jobi George** **6**

2. A Review On The Importance Of Proverbs In English Literature
**Dr. Vinita S Virgandham** **11**

3. Alienation In Rohinton Mistry's 'Squatter'
**Someshwar Wasekar & Dr. Anuradha D. Kherdekar** **17**

4. Exploring The Multifaceted Tapestry Of Indian Culture: Gita Mehta's 'A River Sutra'
**Dr. Raheel K. Quraishi** **21**

5. Human Rights Of Subjugated Populations: Prospects And Challenges
**Dr. Mangesh Kadu** **24**

6. Stress And Its Management
**Dr. Aditya Kishor Sarwe** **31**

7. IPR Awareness Model For Engineering College Faculties
**Rajasree O.P., Mangala A. Hirwade, Sunilkumar U.T.** **34**

8. 'मेक इन इंडिया' आत्मनिर्भर भारतासाठी समर्थ अभियान
**प्रा.डॉ. सुनिल शिंदे** **45**

9. अल्पसंख्याक समुदायांवर पोलिसांच्या वांशिक व्यक्तिचित्रणाच्या प्रभावाचा आणि मानवी हक्कांवर त्याच्या परिणामाचा अध्ययन
**प्रा. डॉ. मोतीराज रा.चव्हाण** **51**

10. प्रयोगात्म विधिनाट्यः गोंधळ
**डॉ. मधुकर वि. नंदनवार** **58**

11. बॅकिंग क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाची उपयुक्तता
**डॉ. अनिता वि. महावादीवार** **63**

12. भारतीय कंपन्यांचे ई—कॉमर्स मध्ये वर्चस्व
**प्रा. डॉ. राजेश सं. बहूरुपी** **68**

**10.**

# प्रयोगात्म विधिनाट्य: गोंधळ

**डॉ. मधुकर वि. नंदनवार**
भिवापूर महाविद्यालय भिवापूर

**सारांश**

अनेक शतकापासून भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात विविध लोककलांना व विधीनाट्यांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. समृध्द लोककलांचा वारसा आपल्या महाराष्ट्राला लाभला आहे याचे कारण विविध विधिनाट्य व लोककलांनी आपले परंपरागत अस्तित्व जपून ठेवले. मौखिक आणि ग्रांथिक अशा दोन भक्कम तीरांमधून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा प्रवाह अखंडपणे वाहत आहे. या परंपरेशी नाते सांगत असतांनाच सद्यपरिस्थितीशीही सतत स्वत:ला जोडून घेत असतात. लोककलांमध्ये असलेल्या या लवचिकतेमुळेच लोककलांचे अस्तित्व आजही निश्चितपणे टिकून आहे. मात्र प्रत्यक्षात लोककला म्हणताना आपल्याला मुख्यत: प्रयोगात्म लोककला (परफार्मिंग फोक आर्ट) अपेक्षित असतात. सामान्यत: लोककलांचे प्रयोगात्म लोककला आणि हस्तकला असे महत्वाचे प्रकार पाडता येतात. महाराष्ट्र हा प्रदेश अनेक कलांचे माहेरघर आहे असे म्हटले जाते. पूर्व व पश्चिम महाराष्ट्राला एक सांस्कृतिक व भौगोलिक इतिहास प्राप्त झाला आहे. या महाराष्ट्राच्या मातीने अनेक लोककलांना जन्माला घातले व लोककलाप्रकारांनी लोकांची रंजनाची भूक भागविली. ते गोंधळ विधीनाट्ये परंपरेने आपल्या पूर्वतेजाने टिकून आहे. प्रयोगात्म लोककलांमध्ये पिढयानूपिढया किंवा परंपरेने चालत आलेल्या लोकनृत्य, लोकसंगीत आणि लोकनाट्याचा अंतर्भाव होतो. या सर्व लोककला प्रामुख्याने समूहाने सादर केल्या जातात. तर हस्तकलांचा आविष्कार हा वैयक्तिक स्वरूपाचा असून यात चित्र, शिल्प, सुतारकाम, कुंभारकाम, लोहारकाम अशा रोजच्या जगण्यातील अनेक कलांचा समावेश होतो. परंतु कुठलीही पारंपरिक हस्तकला ही 'लोककला' असतानाही आजवर अधिक लोकप्रियता मिळवू शकली आहे, ती प्रयोगात्म म्हणजे प्रयोगरूपाने सादर होणाऱ्या लोककलांना. कारण या लोककला रसिकांसमोर–प्रेक्षकांसमोर सादर केल्या जातात आणि त्यांना रसिकांचा थेट प्रतिसाद मिळतो. त्यादृष्टिने उपासनाविधी असलेले गोंधळ हे विधिनाट्य आहे. पूर्व व पश्चिम महाराष्ट्रातील 'गोंधळ' या विधीनाट्याचा मागोवा घेताना या लेखात धार्मिकतेचे अधिष्ठान असलेले लोकमाणसाची नितांत श्रध्दा भाव जपणारे प्रयोगात्म विधिनाट्य 'गोंधळ' या कुळाचार विधिनाट्याचा थोडक्यात परामर्श घेतला आहे.

**महत्व–**

महाराष्ट्रात 'गोंधळ' या धार्मिक प्रयोगात्म विधीनाटयाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. वेगवेगळया महोत्सवांत व विविध धार्मिक कार्यक्रम प्रसंगी गोंधळ या लोककलेला स्थान प्राप्त झाले आहे. वेगवेगळया विद्यापीठांतून पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदविच्या संशोधनासाठी तसेच विद्यापीठ अनूदान आयोगाकडून विविध लोककलांचा अभ्यास केला जात असून संशोधन होताना दिसते. अखिल भारतीय लोककला संमेलनांचेही आयोजन केले जात आहे. या सर्वातून लोककलांचे एक आशादायी व आश्वासक चित्र निश्चितच उभे राहते. एकूणातच नागर प्रेक्षकासमोर सादर होणाऱ्या या प्रयोगात्म लोककला मुळात लोकविधी आहेत. लोककला 'कला' म्हणून जन्माला आलेल्या नाहीत, तर धार्मिक अधिष्ठानांशी सबंधीत अशा विधी आहेत. या लोकविधिमधील कलातत्व नागर संस्कृतीत वाढलेल्या लोकांना उशिरा जाणवले आणि त्यांनी अनागर (ग्रामीण) जीवनसंस्कृतीत भरणपोषण झालेल्या या लोकविद्या नागर रंगभूमीवर–रंगमंचावर आणल्या आणि गेल्या काही वर्षात तर गोंधळ, जागरण, या धार्मिक लोककलेला नागर संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. परंतु महाराष्ट्राच्या मातीतल्या किंबहुना जगातल्या कोणत्याही प्रयोगात्म लोककला या मूळ रंजनासाठी निर्माण झालेल्या नाहीत. त्यात 'रंजन'मूल्य मागाहून शोधण्यात आले. पण हे रंजनमूल्य शोधण्याच्या हव्यासातूनच या लोकविधिंचे, ज्या कालांतराने लोककला झाल्या, त्यांचे मूळ सामाजिक संरचनेत असलेले प्रयोजन बदलेले आहे.

**सामाजिक मूल्ये–**

प्रयोगात्म विधिनाट्यामध्ये पूर्वी गोंधळ, जागरण असो किंवा भराड्यांचे भराड या सर्व लोककलांना अनागर संस्कृतीत महत्वाचे स्थान असल्याचे स्पष्ट दिसते. लग्न, बारसे, तेरवी, घरबांधणी अशा विविध प्रसंगी सादर होणाऱ्या या लोकविधितून त्या लोकविधी सादर करणाऱ्या समाजाची उपजीविका चालायची. आजही ग्रामीण भागात काही प्रमाणात का होईना या लोकविधी कुलाचार कुलविधी म्हणून

पार पाडल्या जात आहेत. परंतु पूर्वीच्या काळी या लोकविधी किंवा धार्मिक विधी आणि ते करणाऱ्या समूहांना जे सामाजिक स्थान होते ते आजच्या काळात कमजोर झाले आहे.

गोंधळ सारख्या प्रयोगात्म विधीनाट्याचे सामाजिक स्थान हरवल्यामुळेच गोंधळ किंवा अन्य प्रयोगात्म लोककला सादर करणाऱ्या लोककलावंताची पुढची पिढी परंपरेने आपल्या घराण्यात चालत आलेला वारसा पुढे नेण्यास तयार नाही. पूर्वी लोकविधी या उपजीविकेचे साधन असल्यामुळे आणि आपण करत असलेल्या लोकविधी आपल्या व यजमानाच्या (ज्यांच्या घरी गोंधळ, जागरण, भराड, डायका घातले जाते तो) सुखासाठी असल्याची मनोमन भावना असल्यामुळे, त्या सादर करताना त्या त्या लोककलावंतांची या साऱ्याकडे पाहण्याची दृष्टीही धार्मिक असायची. साहजिकच आपण देवाचे (परमेश्वर) काही काम करतो हे त्यांच्या लोकविधिंच्या सादरीकरणामागचे प्रयोजन होते हे सत्य नाकारता येत नाही.

**सांस्कृतिक मूल्ये:—**

सांस्कृतिक दृष्ट्या पूर्व महाराष्ट्राला अनन्यसाधारण महत्व आहे. 'गोंधळ' हे विधीनाट्य सांस्कृतिक महत्व असणरे विधिनाट्य अनेक भागात फार पूर्वीपासून प्रचलित असून आजही विविध धार्मिक कार्यक्रमानिमित्य सादर केले जाते. 'गोंधळ' हे विधीनाट्य विशेष प्रसिद्व असून गोंधळाचे प्रयोग विविध 'गोंधळ' मंडळाकडून आजही महाराष्ट्राच्या प्रदेशात खेड्यापासून शहरापर्यंत सादर होतात व जनसामान्यांना बघायला मिळतात. सर्वसामान्य जनतेची रंजनाची भूक तर कित्येक वर्षापासून भागविली जातेच शिवाय या विधिनाट्याद्वारे धार्मिक भावना वाढीस लागून लोकउद्‌बोधनाचे कार्यही उत्तम प्रकारे हाते. संस्कृतिची जोपासना या 'गोंधळ' विधीनाट्यातून कित्येक शतकापासून आजही होताना दिसते.

**उद्‌देश—**

बदलत्या काळानूरूप 'गोंधळ' सारखे लोक विधीनाट्य, लोककला सादर करणाऱ्या लोककलावंतांच्या सामाजिक प्रतिष्ठेत घसरण झाल्याचे दिसते. लोककलावंतांच्या हाती उपजीविकेसाठी अन्य मार्ग नसल्यामुळे या समाजाच्या नवीन पिढीने उपजीविकेसाठी अन्य मार्ग अनुसरले. परंतु 'जुने ते सोने' या न्यायाने गेल्या काही वर्षात देशात, महाराष्ट्रात प्रयोगात्म लोककलांना चांगले दिवस आले आणि या विधीनाट्य व लोककला नागर रंगमंचावर सादर होऊ लागल्या. मात्र यामुळे या प्रयोगात्म लोककला सादर करणाऱ्या लोककलावंतांना खरोखरच बरे दिवस आले असे खेदाने म्हणावे लागते. वस्तुस्थिती वेगळी आहे. कारण सर्वत्र लोककलांचा जागर चालला असल्यासारखे दिसत असले, तरी प्रत्यक्षात हे लोककलाकारांना फक्त वापरुन घेण्याचा प्रकार आहे. वेगवेगळ्या महोत्सवातून तसेच वेगवेगळ्या व्यासपीठांवर लोककलावंतांना आणि त्यांच्या कलेला स्थान जरूर मिळते परंतु त्या व्यासपीठावरून खाली उतरल्यावर पुन्हा त्या लोककलावंतांच्या आणि त्यांच्या लोककलेच्या वाट्याला अंधारच आलेला दिसतो. कारण व्यासपीठावरच्या क्षणभरच्या उजाळ्याने, त्यांच्या आयुष्यातला अंधार काही कायमचा दूर होत नाही. आणि तरीही कुणी हाकाटी दिली की, हे लोककलावंत आहे त्या परिस्थितीत आपली कला सादर करायला धावून येतात. कारण आजच्या वास्तवीक जीवनात बहुतेकांचे तेच चरितार्थाचे साधन आहे. आपल्यासाठी ज्या लोककला आहेत, त्या त्यांच्यासाठी त्यांचा व्यवसायच आहे. त्यामुळे आपण जरी त्यांच्या कलेकडे लोककला म्हणून बघत असलो, तरी ते त्या दृष्टीने किती बघतात हा प्रश्नच आहे. किंबहुना अनेकदा लोककलावंत आपल्या कलेकडे परंपरेने चालत आलेला आपद्‌धर्म म्हणूनच पाहत असतात असे दिसते. त्यांना आपण सादर करत असलेल्या अनेक गोष्टी का करतो, तेच ठाऊक नसते. त्यांना त्यामागचा कार्यकारणभाव ठाऊक नसतो व त्यामागची लोकभावनाही माहीत नसते. केवळ त्यांनाच नव्हे, तर लोककलांचे कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांनाही या लोककलांच्या सैध्दांतिक मांडणीशी फार काही देणेघेणे नसते. त्यांना फक्त लोककलांचा 'प्रयोग' म्हणजे सादरीकरण हवे असते. कित्येक वर्षापासून हेच चालत असल्यामुळे लोककलावंतही आपली कला सादर करून मोकळे होतात. पण त्यांना आपल्या एकूणच सादरीकरणाचे विश्लेषण करता येत नाही. गोंधळ, जागरण, या लोककलांना मिळणारे व्यासपीठ आजही इतर लोककलांना खूले झालेले नाही. महाराष्ट्रात एकूणच लोककलांना चांगले दिवस आलेत असे वाटत असले तरी प्रत्यक्षात दिव्याखाली अंधारच आहे. लोककलांमध्ये असलेली ऊर्जा आणि त्यांच्या ठिकाणी असलेली सतत नवनवीन उन्मेष धारण करणारी प्रतिभा शक्ती निर्माण होऊन हे विधीनाट्ये महाराष्ट्राच्या भूमीवर टिकून रहावे, शासनाने गोंधळ सारख्या विधीनाट्याला सर्वतोपरी मदत करावी तसेच या लोककलावंतांना शासनाने पुढाकार घेऊन आर्थिक मदत करावी. मौखिक व अप्रकाशीत साहित्य प्रकाशीत करुन नवीन पिढीसाठी उजेडात आणावे हा मुख्य उद्‌देश यामागचा आहे.

**गोंधळ विधीनाट्य :—**

गोंधळ, कीर्तन, इत्यादी लोक विधीनाट्य शतकानुशतके लोकमानसांवर आपली अतुट छाप ठेऊन आहेत. यातही काही लोककलाप्रकारांना धार्मिक अधिष्ठान असून विशेष महत्व प्राप्त झाले आहे. गोंधळ व कीर्तन ही अशीच धार्मिक विधीनाट्ये महाराष्ट्रात अतिशय महत्वपूर्ण आहेत. ती आजही कुळाचार म्हणून अनेक जातींमध्ये अट्टाहासाने व परंपरेने आयोजित केली जातात. आपल्या परंपरागत दंडकाचा भाग म्हणून बारसे, विवाह, तेरवी, गणपती उत्सव, नवरात्र उत्सव, इत्यादी प्रसंगी दैवाला गोंधळ घालण्याचा व गोधळाचा कार्यक्रम करण्याचा विधी केल्या जातो.

महाराष्ट्र हा प्रदेश अनेक लोककलांचे माहेरघर आहे असे म्हटले जाते. पूर्व व पश्चिम महाराष्ट्राला एक सांस्कृतिक व भौगोलिक इतिहास प्राप्त झाला आहे. या महाराष्ट्राच्या मातीने अनेक लोककलांना जन्माला घातले त्यात व लोककलाप्रकारांनी लोकांची रंजनाची भूक भागविली ती गोंधळ सारखी विधीनाट्ये आपल्या पूर्वतेजाने व परंपरेने टिकून आहेत. आजही खेड्यात घराघरात होणाऱ्या धार्मिक, कौटुंबिक कार्यप्रसंगाचे वेळी कुळाचार म्हणून गोंधळ घातला जातो. 'गोंधळ' या कुळाचारावर लोकमाणसाची नितांत श्रध्दा आहे.

महाराष्ट्रात गोंधळाची परंपरा फार प्राचीन आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेकडील जिल्हयात कथासार गोंधळ पूर्वीपासून आजही त्याच पद्वतीने सादर होत आहे. रंजनाबरोबर उद्बोधनाचा वसा जपलेले गोंधळ हे विधिनाट्ये बहुजन समाजातील लोकांकडून सादर होताना दिसते. विदर्भाच्या गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यात बारसे, विवाह, तेरवी, गणपती उत्सव, नवरात्र उत्सव, व इतर सणांनिमित्य गोंधळ कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या निमित्ताने घरातील प्रमुख व्यक्ति तर कधी गावातील प्रमुख लोक गोंधळ मंडळाची भेट घेऊन कार्यक्रमाची तारीख निश्चित करतात. थोडयाशा बिदागीवर चालणारा गोंधळाचा कार्यक्रम रात्रभर प्रेक्षकांना मनमुराद आनंद देतो. कथासार गोंधळात एखाद्या राजाची कथा सांगून गायन करणे व मध्येमध्ये विविध सोंगे काढून सोंगाच्या द्वारे लोकांचे मनोरंजन करणे हे गोंधळाचे प्रमुख कार्य होय. मुख्य वाद्य संबळ, ढोलकी, तुणतुणे, टाळ, या वाद्याच्या साथीने मुख्य शाहीर कथा गायन करतो, त्याला साथ देणारे साथीदार, सोंगाडया व गाण्याची रीSS ओढणारे यांच्या मेळाव्यात 'गोंधळ' कार्यक्रम संपन्न होतो.

अलंकापूरी पुण्य भूमी पवीत्र हो...जी.....
तेथे नांदतो ज्ञानराजा सुखात हो.... जी...
तया आठविता महा पुण्य राशी..... हो... जी...
नमस्कार आमचा श्री गुरु ज्ञानेश्वराशी...हो...जी..

अशा नमनानंतर राजा दशरथ, भक्तध्रुव, राजा हरिश्चंद्र, चिलीया बाळ इ. पुराणकथावर आधारित धार्मिकतेचे महत्व सांगणाऱ्या कथा सादर केल्या जातात. अत्यंत रसाळ आणि करुणरसपुर्ण अशा कथांच्या माध्यमातून श्रोते मंत्रमुग्ध होतात व गोंधळ कार्यक्रमाला पसंत करुन रात्रभर आस्वाद घेतांना दिसतात.

पूर्व महाराष्ट्रात बारसे, विवाह, तेरवी, गणपती उत्सव, नवरात्र उत्सव, व इतर सणांनिमित्य गोंधळ घालण्याची प्रथा अधिकाधिक लोकांमध्ये आहे. 'गोंधळ' हा शब्द 'गडबड', 'धिंगाणा', 'विचका' या अर्थाने वापरला जात असला तरी त्याला काही सदर्भ आहेत. शंकराचे अकरा रूद्रगण प्रसिध्द आहेत. 'गण' याचा अर्थ भक्त असा होतो. भक्ताचा किंवा गणांचा समुदाय म्हणजेच दल व या गणदलाने रूढ केलेला जो पूजेचा प्रकार तो 'गणदल' असावा. गणदल या शब्दाचे अपभ्रष्ट रूप 'गोंधळ' होय. गोंधळात देवीची स्तुती केल्या जाते. गोंधळ सादरीकरणासाठी सुरूवातीला 'गण' गायल्या जातो. त्यात देवतांना आवाहन केले जाते आणि मंगलकार्य होऊ घातलेल्या कुळावर कृपादृष्टी ठेवण्याची विनंती केली जाते. गणातील प्रत्येक चरण दोन–तीन वेळा गायिले जाते.

गोंधळाचा प्रारंभ 'गण' गायनाने होतो.

माता रेणूके गोंधळा ये
देवी सप्तश्रृंगे गोंधळा ये
मम्मादेवी गोंधळा ये
आई पारबते गोंधळा ये,

पश्चिम महाराष्ट्रात देवीचा गोंधळ अतिशय प्रसिध्द आहे. गोंधळी जातीचे मराठी, कुंभार, कदमराई, रेणुराई,लोक गोंधळाचे कार्यक्रम करतात. 'रेणुराई' हे माहूरच्या रेणुकेचे भक्त असून ते रेणूकेची उपासना करतात तर कदमराई हे तुळजपूरच्या भवानीचे भक्त असून तिचीच पूजा करतात. 'कदमराई' गोधळयांच्या कवडीला गोंडा नसतो. ते पगडीऐवजी कवडयांची उंच टोपी घालतात. प्रथमत: ते गणेशाला स्तवण करतात. तसेच देवीची पूजा करून देवीची गाणी म्हणतात. देवीच्या गाण्यातून तुळजापूरची अंबाबाई, माहूरची रेणूका, कोल्हापूरची लक्ष्मी आईचे महात्म्य वर्णन केलेले असते. गोधळयांच्या आध्यात्मिक स्वरूपाच्या गीतातून आत्मा, परमात्मा यांचे अव्दैत, देव, प्रपंच, देहाला ग्रस्त करणारे विकार यांचे स्पष्टीकरण केले जाते. एवढेच नव्हे तर समाज जीवनाचे दर्शनही घडविले जाते.

गोंधळाची परंपरा फार प्राचीन आहे. या प्राचीन गोंधळ विधीनाटयाचे स्वरुप पुढीलप्रमाणे—

**पुजाविधी:—**

ज्या ठिकाणी गोंधळ घालावयाचा असेल तेथे गोंधळी लोक देवीची पूजा करतात. त्याला चौक भरणे असे म्हणतात. हा चौक भरणे महत्वाचा विधी मानला जातो.

**गण:—**

देवीची पूजा केल्यानंतर गण गायल्या जातो. गण गाताना गणपतीची स्तवनपर गीतू गायली जातात. तसेच इतर देवतांचीही गाणी गाईली जातात.

**देवी महात्म्य:—**

यात देवींचे महात्म्य कथन करणारी गीते गायली जातात. देवीची पूजा विधी संपल्यावर प्रत्यक्ष गोधहाला सुरूवात होते. यामध्ये पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग पडतात. पूर्वरंगात गोंधळी वेगवेगळया देवदेवतांना गोंधळात येण्याचे आवाहन करतात. तसेच मंगलकार्यात कोणतेही विघ्न येऊ नये अशी विनवणी करतात.

देवीचा गोंधळ मांडिला, गोंधळाला यावे
परळीच्या बैजनाथ, गोंधळाला यावे,
औंढ्याच्या नागनाथा, गोंधळाला यावे
जेजुरीच्या खंडेराया, गोंधळाला यावे
गोंधळाला यावे, तुम्ही गोंधळाला यावे
नवलाख तारांगणा, गोंधळाला यावे।
घरतरी माता, गोंधळाला यावे.
देवीचा गोंधळ मांडला, गोंधळाला यावे.

देवीचा गोंधळ मांडला, गोंधळाला येण्याचे आव्हान करताना देवीच्या विविध गीतांचे गायन गोंधळाच्या पूर्वरंगात केले जाते. उत्तररंगात पौराणीक कथांवर कथागीत सादर केली जातात. कथागीतांची संहीता नसते कथानकानुसार कथानकाचा विस्तार केल्या जातो.उदा—

'आई अंबाबाईच्या नावानं....उदो उदो ये।

मायेच्या निजरूप आईचा गोंधळ मांडला ये।

मोरेशर गणा.... गोंधळाला ये,

पुण्याची पार्वती... गोंधळाला ये।

अशारितीने कथानकाची मांडणी केल्या जाते. गोंधळाचा कुलाचार पार पाडणाऱ्या गोंधळ्याला महाराष्ट्राच्या लोकधर्मात विधीनाट्य म्हणून लोकपुरोहिताचा मान आहे. मराठीचे आद्यशाहीर अज्ञानदास आणि तुळसिदास हे गोंधळीच होते. महाराष्ट्रात जो इतिहास दिला तो गोंधळ्यांनीच दिला आहे. एक लोकनाट्य परंतु विधिनाट्य म्हणून आजही गोंधळाचे महत्व अनन्य साधारण आहे.

भूतमातेची कृपादृष्टी किंवा वरदहस्त लभीण्याच्या इच्छेतून निर्माण झालेला उपासनाविधी गोंधळ हा कालांतराने घरातील मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पाड्याबध्दल अंबाबाई, भवानी, रेणूका हयांच्या उपकार स्तवनाचा विधी झाला. केवळ ईश्वराशीच संधान असलेल्या या उपासनाविधी प्रकाराचे स्वरूप जाती विशिष्ठतेमुळे व स्थळ विशिष्ठतेमुळे एकसारखे दिसत नाही. तथापी अशा विविधतेला आपल्यात सामावून घेऊन आजही गोंधळ आपले सांस्कृतिक संचित कायम ठेवत आहे. या संदर्भात समिक्षक साहेब खंदारे ह्यांनी म्हटलेले, ''गोंधळ हा महाराष्ट्राचा कुळाचार. हा कुळाचार महाराष्ट्र लोकसंचितानं नेकीनं चालवित आणला आहे. बदलत्या सांस्कृतिक संक्रमनातही गोंधळ टिकून आहेच.'' हे विधान गोंधळ या कुळाचार असणाऱ्या विधीनाट्याविषयी सार्थ ठरते.

**निष्कर्ष:—**

लोकजीवनात, लोकपरंपरेत, लोकधर्मात आणि देवधर्मात मोलाचे स्थान असलेला 'गोंधळ' हा आदिशक्तीचे स्मरण करून देणारा विधीनाट्य लोक प्रकार आहे. शतकानुशतके जनसामान्यांचा कुळाचाराचा विधी असून लोकांची धार्मिक श्रध्दाभाव असणारे, शारिरीक, मानसिक गरज भागविणारे व रंजनाबरोबर लोकउद्‌बोधन करणारे हे विधिनाट्य आजच्या आधुनिक युगात प्रसारमाध्यमांच्या झपाटयात दुर्लक्षित होत आहे. त्यासाठी गोंधळ विधिनाट्याचे संकलन होणे महत्वाचे आहे. आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात या

लोकप्रकाराला क्षीणता येत चालली आहे. बदलत्या काळात त्याचे कौतुक कमी होत असल्याचे जाणवते. असे असले तरी आदिशक्तीच्या उपासनेची भावना 'भक्तीभाव' आहे तोपर्यंत गोंधळाचे अस्तित्व कायम राहील यात शंका नाही. लोकजीवनाच्या धार्मिक भावनेचा हा विधीनाट्य्य प्रकार असल्याने गोंधळ कायम स्वरूपी राहील.लोकरंगभूमीचा एक सुंदर आविष्कार म्हणजे 'गोंधळ' होय. सांस्कृतिक परंपरांचे रूढी आणि श्रध्दांचे सामाजिक वास्तव आणि नैतिक मूल्यांचे दर्शन घडविणरा प्रकार म्हणजे 'गोंधळ' होय. लोककलेचा आविष्कार करणारे समृध्द वाङ्.मय प्रकार म्हणजे 'गोंधळ'. संत नामदेव, संत एकनाथांनी लोकप्रबोधनासाठी एक हजार वर्षापूर्वी 'गोंधळ' या कला प्रकाराचा वापर केला. आधुनिक काळात याकलाप्रकाराला वाद्याची साथ मिळाल्याने 'गोंधळाचे' सादरीकरण प्रभावी ठरताना दिसते. गोंधळ या विधीनाट्याचे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक महत्व जाणून घेणे महत्वाचे आहे. या विधिनाट्याला धार्मिक अधिष्ठान असल्यामुळे ते चिरंतन टिकणारे आहे. गोंधळ हा उपासनाविधीचा भाग असल्याने त्याचे महत्व निर्विवाद आहे

**संदर्भ ग्रंथ सूची–**


१) जोशी अ.म. भारतीय लोकनाट्य, पुणे, प्रथमावृत्ती १९८०

२) मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, परिमल प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती. १९७८.

३) कालभूत पुरुषोत्तम, लोकनाट्य, उद्गम आणि विकास, विजय प्रकाशन नागपूर १९९७

४) ढेरे. रा.ची. मनोहर, नाव्हेंबर. १९६३

५) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोश, खंड २

६) साहेब खंदारे, लोकसाहित्य.शब्द आणि प्रयोग, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४

७) व्यवहारे शरद, लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, १९९९


❑❑❑